# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०८/०९/२०२२ (गुरूवार)**

**(दुपार)**

---

### घरफोडी

**१) पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत २० कि. मी. अंतरावरील मौजा शिवा येथे दिनांक ०५/०९/२०२२ चे १४.३० वा. ते दिनांक ०७/०९/२०२२ चे ०७.०० वा. पुर्वी फिर्यादी नामे— कु प्रतिक्षा अशोकराव राउत वय २१ वर्ष, रा. नरखेड, ह.मू शिवा ता.जि. नागपूर हि देवळीकाळबांडे येथे पोस्ट ऑफीसमध्ये एबीपीएम या पदावर नोकरी करते व शिवा येथे रूम करून किरायाने राहते. फिर्यादी हि नरखेड येथे आपले घरी गणपतीचा कार्यक्रम असल्याने गावी गेली होती. फिर्यादीचे शेजारी राहणारे रवि सहारे यांनी फिर्यादीस फोन करून सांगितले की, फिर्यादीच्या रूमचे दार उघडे असून आत जावून पाहिले असता कॉम्पूटरच्या टेबलचे लॉकर उघडे आहे हे समजताच फिर्यादी लगेच शिवा येथे येवून बघते की रूमचे दार उघडे असून रूममधील कॉम्पूटरचे टेबलचे लॉकर मधील वेगवेगळया किंमतीच्या कोऱ्या नोटा नगदी ९,०००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार राठोड मो.नं. ८८३०७९६३७८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. देवलापार** :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा रमजान घोटी येथे दिनांक ०६/०९/२०२२ चे १२.०० वा. ते १७.०० वा. फिर्यादी नामे— संतोश शिवराम वरखडे, वय ५८ वर्ष, रा. रमजान घोटी यांचे घरातील कुलूप अज्ञात आरोपीने उघडून घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने आलमारी मधून सोन्याचे मंगळसुत्र व गळयातील लॉकेट किंमती २०,०००/—रू., नगदी २०,०००/—रू. असा एकुण कि. ४०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक संदीप नागोसे मो.क्र. ७९७२२१२१३२ हे करीत आहे.

### चोरी

**१) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील झुल्लर रोड वडोदा शिवार वडोदा येथे दिनांक ०६/०९/२०२२ चे २२.०० वा. ते दिनांक ०७/०९/२०२२ चे ०८.०० वा. सुमारास वडोदा शिवारातील श्री बालाजी सेल्स देशी दारू भट्टी दुकानाचे कुलुप अज्ञात आरोपीने तोडुन दुकानात प्रवेश केला. यानंतर आरोपीने दुकानात ठेवलेल्या देशी दारू भिगरी संत्रा च्या १६ पेटी कि ४७,४४०/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— प्रशांत मनिकराव लांडगे वय ३२ वर्ष, रा. वडोदा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक कोमल कडु मो.क्र. ८६६८५९९६२१ हे करीत आहे.

# रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. मोदा** :– अंतर्गत गुमथळा कामठी येथे दिनांक ०७/०९/२०२२ चे ०१.०० वा. ते ०२.०० वा. दरम्यान फिर्यादी हे पेट्रोलींग करीत असता पो.स्टे. मोदा हद्दीतील सोनेगाव घाटाकडुन ६ चाकी ट्रक एमएच– ४०/वाय– २०३९ व २ ब्रास रेती अवैधरित्या चोरी करून घेवुन जात आहे. अशा मिळालेल्या माहीतीवरून पो.स्टे. मौदा चा स्टाफ घटनास्थळी गेला असता सदर आरोपी क्र. १. मिथुन चरणदास देवगडे, वय ३० वर्ष, रा. सोनेगाव राजा कामठी व ट्रक मालक २. तुकाराम पंजाबराव ढोबळे, रा. उनगाव कामठी हे तेथे हजर मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन घटनास्थळावरून ६ चाकी ट्रक एमएच– ४०/वाय– २०३९ कि ७,००,०००/–रू. व २ ब्रास रेती कि ८,०००/–रू. असा एकुण कि कि. ७,०८,०००/–रू. चा मुद्देमाल अवैधरित्या विनापरवाना भरून रेतीची चोरटी वाहतुक करतांनी मिळुन आले. वाहनासह एकुण ७,०८,०००/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक तुषार कुडुपले पो.स्टे. मौदा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, १०९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि सोनेकर मो.क्र. ८२०८३३५१९४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**